महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६७ वा | दिनांक : २१/०८/२०२५ | वार : गुरूवार

## ओबीसी हिताचा निर्णय शरद पवारांनीच घेतला - महादेव जानकर



**जालना** : महाराष्ट्रात आता पुन्हा एकदा मराठा आणि ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पेटणार आहे. २९ ऑगस्ट रोजी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील मुंबईकडे मोर्चा वळवणार आहेत. तर दुसरीकडे ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून अनेक नेते शरद पवारांना लक्ष्य करतात. त्यात आमदार गोपीचंद पडळकर हे सातत्याने शरद पवारांवर टीका करताना दिसून येतात. परंतु, राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख व माजी मंत्री महादेव जानकर यांनी शरद पवारांवर टीका करणाऱ्यांवर पलटवार केला आहे.

क्रांती दिनाचे औचित्य साधत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने ओबीसी मंडल यात्रा सुरू केली असून यावर महायुतीच्या नेत्यांनी टीका करायला सुरुवात केली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीची ओबीसी मंडल यात्रा सध्या जालन्यात दाखल झाली असून यावेळी महादेव जानकर देखील उपस्थित होते. यावेळी बोलताना जानकर यांनी शरद पवारांवर टीका करणाऱ्यांना प्रत्युत्तर दिले आहे.

महादेव जानकर म्हणाले, ओबीसीच्या हिताचे प्रश्न घेऊन ही यात्रा जात असल्यामुळे मंडल यात्रेचे स्वागत करण्यासाठी मी स्वतः हजर झालो आहे. ओबीसीच्या हिताचा निर्णय घ्यायचे काम शरद पवार यांनी केले आहे. आंब्याच्या झाडाला माणसे दगड मारतात, ज्याला फळ नसते त्याला कोणी दगड मारत नाही, असे म्हणत महादेव जानकर यांनी शरद पवारांवर टीका करणाऱ्यांना टोला लगावला आहे.

दरम्यान, महादेव जानकर यांनी महायुतीच्या विरोधात भूमिका मांडायला सुरुवात केली असल्याचे दिसत आहे. काही दिवसांपूर्वी मराठीच्या मुद्द्यावरून जानकर यांनी ठाकरेंची साथ देत महायुती व भाजपवर टीका केली होती. तसेच ठाकरेंच्या विजयी मेळाव्याला देखील ते उपस्थित होते. आता आगामी स्थानिक निवडणुकीच्या अनुषंगाने महादेव जानकर हे महाविकास आघाडीसोबत जाणार असल्याच्या देखील चर्चा सुरू झाल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या वतीने राज्यभरात 'मंडल यात्रा' आयोजित करण्यात येत आहे. क्रांती दिनाचे औचित्य साधत नागपूर येथून या यात्रेला सुरुवात झाली असून, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नागपुरात हिरवा झेंडा दाखवून तिचा शुभारंभ केला. मात्र, या मंडल यात्रेवर महायुती आणि भाजपकडून जोरदार टीका करण्यात आली आहे.

वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनीही या यात्रेवर टीका करत गंभीर आरोप लावले आहेत. त्यांनी म्हटले की, विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीस राष्ट्रवादी काँग्रेसकडून विरोध करण्यात आला होता. ओबीसी समाज श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात जात आहे आणि श्रीमंत मराठा हा राष्ट्रवादीचा मुख्य आधार आहे. त्यामुळे ओबीसी वर्ग श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात जाऊ नये, हाच या मंडल यात्रेमागचा राजकीय हेतू आहे, असा आरोप आंबेडकरांनी केला आहे.

## ठाकरेंनी राजकीयकरण केल्याने जनतेने नाकारले



**पुणे** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात माध्यमांशी संवाद साधत असताना, विविध विषयांवर भाष्य केले. विशेष म्हणजे, बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीवर भाष्य करत त्यांनी ठाकरेंना टोला लगावला. ठाकरे बंधूंनी या निवडणुकीचे राजकीयकरण केले, त्यामुळे जनतेने त्यांना नाकारले, अशी टीका त्यांनी केली. तसेच संजय शिरसाट सिडको अध्यक्ष असताना मोठा घोटाळा झाल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. यावरही मुख्यमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली.

बेस्टच्या पतपेढीच्या निवडणुकीचे राजकीय करण करण्यात येऊ असे माझे मत होते. पण ठाकरेंनी त्याचे राजकीय करण केले. पतपेढीच्या निवडणुकीला शशांक राव आणि प्रसाद लाड उभे होते. दोघेही आमचेच आहेत. पण त्यांनी ठाकरे बंधू एकत्र, ठाकरे ब्रँड निवडून येणार, अशाप्रकारे त्यांनी राजकीय करण केले. ते लोकांना आवडलेले दिसत नाही. त्यामुळे त्यांना एकही जागा मिळालेली नाही. या निवडणुकीत तरी त्यांना लोकांनी नाकारल्याचे चित्र आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

रोहित पवार यांनी संजय शिरसाट यांच्या ५ हजार कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता, रोहित पवारांनी पुरावे दिले पाहिजेत, अशी प्रतिक्रिया दिली. रोहित पवारांसारखेल मंडळी रोज आरोप करत असतात. विना पुराव्याचे आरोप करणे योग्य नाही. पुराव्यानिशी आरोप केल्यास त्यावर परिणात्मक उत्तर मिळते. त्यांच्याकडे काय पुरावे आणि नेमके प्रकरण काय आहे? त्याबद्दल माहिती नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज्यातील पूरस्थितीबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, पूरस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आलेली आहे. काही भागात अजूनही पाऊस जोरात सुरू असून, आजही रेड अलर्ट आहे. आपत्ती व्यवस्थानपनाच्या संदर्भातील सर्वतोपरी काळजी घेण्यात आलेली आहे. इशारा पातळीच्यावर नद्या गेलेल्या आहेत, तिथे धरणातून विसर्ग वाढवून व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न सुरू आहे. वेगवेगळ्या राज्यांसोबत चर्चा सुरू असून, त्यांचेही सहकार्य मिळत आहे. आपल्या विनंतीप्रमाणे ते त्यांच्या धरणातील विसर्ग वाढवत आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

## मुख्यमंत्री, पालकमंत्री, नगरविकास मंत्री प्रकट व्हा!:ठाकरे गटाचे 'ॐ फट स्वाहा' आंदोलन




**पुणे** : सिंहगड रोडवरील विठ्ठलवाडी ते माणिकबाग हा उड्डाणपूल पूर्ण होऊनसुद्धा फक्त सत्ताधारी नेत्यांच्या उद्घाटनासाठी वेळ न मिळाल्याने जनतेला वाहतूककोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या या ज्वलंत प्रश्नाकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, पुणे शहराच्या वतीने बुधवारी आगळेवेगळे आंदोलन करण्यात आले.

सिंहगड रोडवरील नवीन उड्डाणपुलावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री अजित पवार आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिमेसमोर "ॐ फट स्वाहा" म्हणत होम-हवन करून पूल जनतेसाठी सुरू करण्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनादरम्यान "सिंहगड रोडवासीयांना ट्रॅफिक जॅममध्ये अडकवणाऱ्या सरकारचा निषेध होवो" अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

यावेळी बोलताना शहरप्रमुख संजय१ मोरे म्हणाले, पुलाचे काम जनतेच्या कररूपी पैशातून पूर्ण झाले असूनही केवळ सत्ताधाऱ्यांच्या उद्घाटन सोहळ्याच्या हव्यासापोटी नागरिकांची गैरसोय केली जात आहे. आज पुण्यातच असले तरी मुख्यमंत्री फडणवीस उड्डाणपुलाचे उद्घाटन करायला आले नाहीत. कारण फक्त दोन दिवसांच्या पावसात या नव्या पुलावर खड्डे पडले आहेत. पुढील पाच दिवसांत पूल सरकारने सुरू केला नाही तर शिवसेना स्वतःच्या पद्धतीने जनतेसह या पुलाचे उद्घाटन करेल.

यावेळी आंदोलनस्थळी पुणे मनपाचे प्रकल्प अधिकारी उपस्थित होते,त्यांनी येत्या 4 दिवसात सर्व कामे पूर्ण करून हा उड्डाणपूल सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले.

या आंदोलनात शहर प्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, उपशहर प्रमुख भरत कुंभारकर, महिला आघाडीच्या पद्मा सोरटे, सचिन पासलकर, संतोष गोपाळ, नितीन वाघ, महेश मते, गोकुळ करंजवणे, अनंत घरत, किशोर राजपूत, महेश पोकळे, अमोल दांगट, सूरज लोखंडे, वैभव हनमघर, पराग थोरात, दिलीप पोमन, राजाभाऊ चव्हाण, शिवा पासलकर तसेच मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ ऑगस्ट २०२५


## जागतिक छायाचित्रकार दिनानिमित्त रोटरी क्लब मुरूम सिटीचा उपक्रम



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने जागतिक छायाचित्रकार दिनाचे औचित्य साधून ग्रामीण रुग्णालय मुरूम येथील सर्व रुग्णांना फोटोग्राफर यांच्या वतीने व रोटरी क्लब मुरूम सिटीच्या सहकार्याने फळांचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ग्रामीण रुग्णालयातील डॉ. गंगासागरे यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी सर उपस्थित होते.या प्रसंगी शहरातील प्रमुख छायाचित्रकार उपस्थित होते , "फोटोग्राफर म्हणजे क्षणांना कायमस्वरूपी स्मरणात ठेवणारा कलाकार आहे; समाजातील घडामोडींचे जतन करण्याचे मोठे कार्य त्यांच्या माध्यमातून घडते." असे प्रतिपादन रोटे डॉ.आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले . यानंतर शहरातील फोटोग्राफर गोपाळ इंगोले, दिलीप जाधव, काशिनाथ बिराजदार, खाशीम कोतवाल, वैभव शिंदे, पंडित पीचे, सिद्धेश्वर पीचे, स्वप्नील पांचाळ, प्रशांत ढवळे, सुनील दीक्षित, निसार शेख, संकेत इंगोले, संदीप बाबळसुरे यांचा रोटरी क्लबच्या वतीने शाल, फेटा व पुष्पगुच्छ देऊन यथोचित असा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी रोटे. संतोष कांबळे, रोटे. सुनील राठोड, रोटे.राजाराम वाकडे, रोटे.कल्लाप्पा स्वामी, रोटे डॉ. सुधीर पंचगल्ले आदिनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रोटे. संतोष कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन रोटे.सुनील राठोड यांनी मानले.

## रेड रिबन क्लब अंतर्गत जागतिक युवा दिन निमित्त मार्गदर्शन



**कन्नड : (प्रतिनिधी)** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आज दिनांक 20ऑगस्ट 2025 रोजी शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कन्नड येथे जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग छत्रपती संभाजीनगर तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर अंतर्गत ग्रामीण रुग्णालय कन्नड ICTC कन्नड , ART सेंटर कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी श्री संजय सोनवणे समुपदेशक ग्रामीण रुग्णालय कन्नड यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचे निराकरण केले आणिविद्यार्थ्यांना शपथ दिली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर बी. के. मगर हे होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि रेड रिबन क्लब अंतर्गत विविध उपक्रमाची नवीन सदस्य आणि कार्यकारिणी बाबतीत मार्गदर्शन रेड रिबन क्लबचे समन्वयक डॉक्टर प्रशांत संघई यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे एनएसएस प्रमुख डॉ. महाजन तसेच डॉ. डी. टी. साखरे, डॉ. आर. व्ही. अहिरराव, डॉ. आर. डी. झाडे, डॉ. के. एल.भानुसे,डॉ. एस. बी. हूसे,डॉ. जे. व्ही.भेलांडे आणि श्री. शशिकांत गांगुर्डे ग्रामीण रुग्णालय कन्नड रेड रिबनक्लब विद्यार्थी प्रतिनीधी रोहित क्षीरसागर, कमलेश कदम कल्याणी सोनवणे नंदिनी इंगळे उपस्थित होते.

## राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिवस म्हणून साजरी



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात आज दिनांक वीस ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने स्वर्गीय माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एम.राठोड हे होते तर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.दस्तगीर पठाण व डॉ.कुन्हाळे हे प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे डॉ.दस्तगीर पठाण व डॉ.जी.एम राठोड यांच्या यांच्या हस्ते माजी स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना सर्वांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.या सद् भावना दिवसाचे औचित्य व महत्व सांगताना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आर.एन निगडे यांनी या कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की ज्या वंशवादातून स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाली ती विषवंशीय मानसिकता समाजात राहू नये ,त्या विषवल्लीचा संपूर्ण नायनाट व्हावा,जाती जातीत, धर्मा धर्मात एक सलोख्याचे,सौहार्दाचे नातेसंबंध रहावे,एक राष्ट्र म्हणून आपल्याला कणखरपणे उभे राहता यावे, एकीकृत आणि समताधिष्ठित समाज निर्माण व्हावा यासाठी आपण हा दिवस गेली कित्येक वर्ष सद् भावना दिवस म्हणून साजरा करतो आहोत,स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकताना आर.एन निगडे यांनी संगणक क्रांतीचा आवर्जून उल्लेख केला. खूप कमी काळामध्ये त्यांनी भारत राष्ट्राला एक आंतरराष्ट्रीय ओळख दिली त्यांची दैदिप्यमान कारकीर्द विसरणे कदापि शक्य नाही.असा विरळा पंतप्रधान पुन्हा नाही अशी भावना व्यक्त करून प्रा. डॉ.आर.एन निगडे यांनी आपले प्रास्ताविक मांडले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.भाऊसाहेब उगले यांनी सर्वांना सद् भावना शपथ दिली आणि उपस्थितांचे आभार मानले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला प्रतिनिधी तथा कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. एम.जी.आंभुसे, डॉ. आशिया चिशती, डॉ.किसन लोहार,डॉ. मांदळे, डॉ. इनामदार, डॉ. पतंगे, डॉ. होगाडे, डॉ. विजापुरे, डॉ. चव्हाण, डॉ. कोळी, डॉ. काळदाते यांच्याबरोबरच बहुसंख्य कर्मचारी व विद्यार्थी बेसंख्येने उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ ऑगस्ट २०२५

## शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथे जागतिक युवा दिनानिमित्त एच.आय.व्ही.-एड्स जनजागृती कार्यक्रम



**कन्नड (प्रा. प्रकाश खेत्री) :** दि. 20 ऑगस्ट :जागतिक युवा दिन (12 ऑगस्ट) निमित्त आज दिनांक 20 ऑगस्ट, 2025 रोजी शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथे IEC intensified campaigning अंतर्गत रेड रिबन क्लबच्या वतीने एच.आय.व्ही.-एड्स जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमात जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग छत्रपती संभाजीनगर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर, ग्रामीण रुग्णालय कन्नड ICTC तसेच ART सेंटर कन्नड यांचा सहभाग होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर यांनी भूषविले. यावेळी ग्रामीण रुग्णालय कन्नडचे समुपदेशक श्री. संजय सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना एच.आय.व्ही.-एड्स विषयक सविस्तर मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन केले तसेच विद्यार्थ्यांना शपथ दिली.रेड रिबन क्लबचे समन्वयक डॉ. प्रशांत संघई यांनी प्रास्ताविक करून क्लब अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली तसेच नवीन सदस्य व कार्यकारिणी संदर्भात मार्गदर्शन केले.या प्रसंगी महाविद्यालयाचे एनएसएस प्रमुख डॉ. महाजन, डॉ. डी. टी. साखरे, डॉ. आर. व्ही. अहिरराव, डॉ. आर. डी. झाडे, डॉ. के. एल. भानुसे, डॉ. एस. बी. हूसे, डॉ. जे. व्ही. भेलोंडे, श्री. शशिकांत गांगुर्डे (ग्रामीण रुग्णालय, कन्नड) तसेच रेड रिबन क्लबचे विद्यार्थी प्रतिनिधी रोहित क्षीरसागर, कमलेश कदम, कल्याणी सोनवणे व नंदिनी इंगळे उपस्थित होते.

## तिफण वाचक जागृती अभियानाचे आयोजन - प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते होणार उद्घाटन




**कन्नड : (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यात वाचन संस्कृती वृद्धिंगत होऊन वाचन चळवळीस गती मिळावी, विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून देऊन त्यांनी उत्तमोत्तम पुस्तकाचे वाचन करावे, त्यांच्यावर वाङमयीन संस्कार व्हावेत या महत्वपूर्ण उद्देशाने त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, मराठी विभाग व आजीवन विस्तार विभाग शिवाजी महाविद्यालय कन्नड , आणि अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था पुणे, शाखा कन्नड यांच्या वतीने कन्नड तालुक्यात तिफण वाचक जागृती अभियान राबविण्यात येणार आहे. त्याचा पहिला टप्पा म्हणजे कन्नड शहरातील १० निवडक शाळा निवडल्या आहेत. या शाळेत जाऊन विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधणार आहोत. २१ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान विविध शाळेत जाऊन वाचनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देणार आहोत. या अभियानाचा उदघाटन समारंभ २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वा. सावित्रीबाई फुले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात होणार आहे. त्यानंतर स्व. काशिनाथराव पाटील जाधव विद्यालय, कन्नड येथे विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधणार आहोत. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत असून त्यांच्या शुभहस्ते या अभियानाचे उदघाटन संपन्न होणार आहे. या अभियानात विद्यार्थी व शिक्षकांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक डॉ. शिवाजी हुसे, समन्वयक डॉ. रामचंद्र झाडे, प्रविण दाभाडे, अरुण थोरात,ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, अनिता राठोड, शुभदा देवरे, भिमराव सोनवणे, संदीप ढाकणे, श्रीराम दापके, सुरेश औटे, संदीप वाकडे यांनी केले आहे.

## माळीवाडा जवळ १६ लाख ७० हजार रुपयांचा गुटखा पकडला




**दौलताबाद (जावेद अहमद) :** १६ लाख रुपयांचे वाहन ही केले जप्त गुन्हे शाखेची माळीवाडा परिसरात कारवाईप्रतिबंधीत असलेल्या गुटखा आणि सुगंधित तंबाखू च्या साठ्याची वाहतूक करणारा ट्रक गुन्हा शाखा व अन्न व औषध प्रशासन यांनी दि २० ऑगस्ट बुधवार रोजी पकडला या कारवाईत पोलिसांनी सोळा लाख सत्तर हजार सातशे साठ रुपये किमतीचे गुटखा व ट्रक आणि मोबाईल असा बत्तीस लाख त्रानवे हजार सातशे साठ(३२९३७६०) रुपये किमतीचे मुद्देमाल जप्त करण्यात आले असल्याची माहिती गुन्हा शाखा पोलिसांनी दिली आहेगोकुळ रामप्रभु गळकर वय ३७ वर्ष राहणार कुटेवाडी तालुका पाटोदा जिल्हा बीड असे पोलिसाच्या ताब्यात असलेल्या चालकाचे नाव आहेगुन्हे शाखेचे पथक व अन्न व औषध प्रशासन यांना गुप्त माहिती मिळाली की धुळे सोलापूर महामार्गाने माळीवाडा मार्गाने छत्रपती संभाजी नगर कडे अशोक लेलेंड ट्रक मध्ये गुटखा घेऊन येणार आहे यावरून पोलीस उपनिरीक्षक प्रवीण वाघ यांची टीम व अन्न औषध प्रशासन अधिकारी प्रशांत कुचेकर यांनी माळीवाडा येथे सापळा रचला त्याचवेळी अशोक लेलेंड ट्रॅक क्र MH19 CY 7507 दिसून आले त्याला थांबून चालक गोकुळ रामप्रभु गळकर याला याला ताब्यात घेत पंचा समक्ष ट्रक ची झडती घेतली असता त्यामध्ये हिरा पान मसाला च्या ८० गोण्या रायल ७१७ तंबाकू च्या १३ गोण्या व विविध असलेल्या २६ गोण्या असा एकूण सोळा लाख सत्तर हजार सातशे साठ रुपये किमतीचे गुटखा व ट्रक आणि मोबाईल असा ३२लाख त्रानवे हजार सातशे साठ रुपये किमतीचे मुद्देमाल जप्त करण्यात आले आहेयाप्रकरणी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये अन्न औषध प्रशासन अधिकारी प्रशांत यांच्या फिर्यादी वरून ट्रॅक चालक गोकुळ रामप्रभु गळकर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहेही कारवाई उपनिरीक्षक प्रवीण वाघ ,पोलीस अंमलदार नवनाथ खांडेकर,सोमनाथ भालेराव,विजय निकम,कृष्णा गायके व अन्न औषध अधिकारी प्रशांत कुचेकर यांनी केली आहे

प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ ऑगस्ट २०२५


## राजीव गांधी महाविद्यालयात राजीव गांधी जयंतीनिमित्त वृक्ष लागवड




**छत्रपती संभाजीनगर :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत राजीव गांधी जयंती निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.प्रा. मनोज देवकर यांचे "डिजिटल इंडियात राजीव गांधींचे योगदान" या विषयावर विशेष व्याख्यान ठेवण्यात आले होते. यंत्रयुगात जी प्रगती झाली त्यात राजीव गांधी यांचे योगदान मोठे होते अशी भूमिका त्यांनी मांडली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे हे अध्यक्ष समारोप करताना म्हणाले राजीव गांधीनी एकवीसाव्या शतकाकडे पाहताना जागतिक परिवर्तन डोक्यात ठेवून काम केले होते. सुरुवातीला एन एस एस प्रमुख डॉ. कालिदास फड यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. नितीन मुळे यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रा. अमित राऊत यांनी केले. या जयंती निमित्त महाविद्यालयात विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. कार्यक्रमानंतर एन एस एस विभागातर्फे महाविद्यालयात वृक्षलागवड करण्यात आली. यासाठी डॉ. नरेश डहाळे, डॉ. अश्विनी कुमार चिंचोलिकर,डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ जयश्री पाटील, डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. हरिदास होळकर, डॉ. ललित गोल्डे, डॉ. पठाण, प्रा. लक्ष्मण खरात, प्रा. माठे, ज्ञानेश्वर जाधव, मधुकर राठोड, आदिनी मेहनत घेतली.

## राजकीय वर्चस्वासाठी धार्मिक विषयाचा उपयोग होता कामा नये - भरत आमदापूरे



**छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) :** विद्यापीठात 'विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन व्याख्यन संपन्न प्रतिनिधी छत्रपती संभाजी नगर,पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगष्ट २०२१ रोजी लाल किल्ल्यावरुन आपल्या भाषणात १४ ऑगष्ट या दिवशी 'विभाजन एक विभिषिका स्मृतिदिन' म्हणून साजरे करण्याचे ठरवले होते त्यानुषंगाने दिनांक .२० ऑगस्ट २०२५ रोजी. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर,इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभाग यांच्या वतीने" विभाजन : एक विभिषिका "स्मृतिदिन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते .सदर व्याख्यान: एम.ए. प्रथमवर्ष राज्यशास्त्र विभागाचा हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर. येथे दि. २०/०८/२०२५ रोजी झाले.तरी या व्याख्यानाला इतिहास प्रेमी व युवकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला इतिहास विभागाच्या वतीने करण्यात आले असून यात प्रमुख व्याख्याते म्हणून श्री.भरत उत्तमराव आमदापूरे (पुणे - उदगीर जि. लातूर) यांनी नी व्याख्यान दिले.त्यावेळी ते बोलत होते की मोहम्मद अली जीना यांच्या प्रादेशिक वर्चस्ववादी विचारांमुळे भारताची फाळणी झाली. त्यामुळे भारताच्या संस्कृतिक, राजकीय, सामाजिक घडामोडीवर परिणाम होत गेला. प्रचलित समाजापुढे वेगवेगळे आदर्श असल्यामुळे हे एक राष्ट्र होऊ शकत नाही, असे डॉ .बाबासाहेब आंबेडकर सांगत होते. यासाठी हिंदू मुस्लिम या दोन संस्कृती या देशात या आदर्श्यांना समोर ठेऊन चालत आहे. दोन समाजातले उद्भवलेले संघर्ष मिटायला हवे. अखंड भारतापुढे अनेक अडचणी आ करून उभ्या आहेत, आपापले उत्सव, सण साजरे करा परंतु धर्मातील धार्मिक कट्टरवाद संपुष्टात यायला हवा. आधुनिक समाजात. आधुनिक मूल्यांचा स्वीकार व्हावा. समान मूल्य,अधिकारांना न्याय द्या, राजकीय वादासाठी धार्मिक विषयाचा उपयोग होता कामा नये , धर्माच्या आधारावर भेदभाव होता कामा नये यावर विचार होणे महत्त्वाचे आहे. यासाठी प्रत्येक भारतीयांनी जागृत राहून भारतीय घटनेने बहाल केलेल्या केंद्रीय अधिकारां अन्वये कार्य करणे महत्वाचे आहे.म्हणून धर्माच्या अनुषंगाने नकारात्मक दृष्टी बदला दृष्टीकोन आपोआप बदलेल व संशोधकीय प्रबोधन होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.या कार्यक्रमासाठी प्रा.डॉ.व्यंकटेश लांब,व्यवस्थापन परिषद सदस्य ,कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा.डॉ.वाल्मिक सरवदे हे होते. त्यावेळी ते म्हणाले की, पुणे आणि लखनौ करार केवळ एका जातीसाठी नव्हे तर अठरा पगड जातीच्या हितासाठी होते हे विसरता कामा नये, घटनेचा आदर सर्वांनीच करायला हवा, बाबासाहेब हेच घटनेचे शिल्पकार होते, बाबासाहेब हे कधीही निजामाचे हस्तक नव्हते असे अध्यक्षीय भाषणात म्हणाले. यावेळी इतिहास विभाग प्रमुख. प्रा.डॉ. गीतांजली बोराडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर कार्यक्रमासाठी प्रा. डॉ. पुष्पा गायकवाड, प्रा. डॉ दिवाकर कुलकर्णी,प्रा.डॉ.गीता पाटील प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, प्रा. डॉ. टी आर पाटील, प्रा .डॉ. सोमनाथ खाडे, प्रा. डॉ. अपर्णा पाटील , प्रा.डॉ.वैशाली खापर्डे,प्रा.डॉ.प्रेम खडकीकर, प्राचार्या बंदिनी खडकीकर, प्रा.डॉ.नम्रता भोसले, डॉ .आर आर चव्हाण, डॉ. कुमार भवर , डॉ. सचिन बोराडे,प्रा.शिवाजी गायकवाड यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राहुल बचाटे, पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.सोनाली म्हस्के यांनी करून दिला तर आभार डॉ.संजय पाईकराव यांनी केले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर



या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ ऑगस्ट २०२५


## पळसखेडा येथे हिंस्र प्राण्याने केलेल्या हल्ल्यात वृध्दाचा मृत्यू



**कन्नड (अरुण थोरात):** पळसखेडा ता.कन्नड येथील गावालगत घरात झोपलेल्या वयोवृद्ध व्यक्तीवर हिंस्र प्राण्याने केलेल्या हल्ल्यात सुभाष लक्ष्मण काकडे (वय 65 वर्षे) यांचा मृत्यू झाल्याची घटना दि. 20 आगस्ट रोजी पहाटे च्या सुमारास घडली आहे.याबाबत ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार पळसखेडा येथील वयोवृद्ध सुभाष काकडे यांचे गावालगत पाण्याच्या टाकी जवळ निर्माणाधीन घर आहे. ते आपल्या घरातील खाटेवर झोपलेले होते. बुधवारी पहाटेच्या सुमारास त्यांच्या वर बिबट्याने हल्ला केला. त्यांना अर्धांगवायू चा आजार असल्याने ते प्रतिकार करु शकले नाहीत. त्यांच्या शरिरावर ठिकठिकाणी हिंस्र प्राण्याने चावे घेतले. सकाळी ग्रामस्थांची पाणी भरण्याची धावपळ असल्याने काही जणांनी त्यांना आवाज दिला. मात्र आतून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने काहींनी आत जाऊन पाहिले असता सुभाष काकडे हे रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे आढळून आले. परिसरात बिबट्या सदृष्य प्राणी व कुत्र्याच्या पावलांचे ठसे आढळून आल्याचे प्रत्यक्षदर्शी नी सांगितले. मयत सुभाष काकडे यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली असा परिवार आहे. घटनेची माहिती वनविभाग व पोलीसांना देण्यात आली. त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून प्राथमिक आरोग्य केंद्र औराळा येथे मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. देवगाव रंगरी पोलीस स्टेशन येथे घटनेची नोंद करण्यात आली आहे.सदरिल घटनेमुळे गाव परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून तात्काळ बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## जे. ई. एस. महाविद्यालयात जागतिक डास दिवस साजरा




**जालना :** दिनांक 20 ऑगस्ट 2025 रोजी जे. ई. एस. महाविद्यालय जालना येथे प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक डास दिनाचे औचित्य साधून लोकांमध्ये डास, त्याची ओळख, त्यापासून होणारे आजार या विषयी विविध पोस्टर तयार करण्यात येवून त्याचे सादरीकरण केले. तसेच जालना जिल्ह्यात सापडणाऱ्या डासाच्या प्रजाती व होणारे आजार याचा गोषवारा सदर करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी व गावातील नागरिकाने उपक्रमास भेट देऊन समजून घेतले. याच अनुषंगाचे प्राणीशास्त्रात 10 विद्यार्थी संशोधन करत आहेत. तसेच डासांपासून होणारे आजार कसे नियंत्रित करता येतील यासाठी एक पायलट प्रोजेक्ट नीती आयोगास पाठवण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उद्धाटन प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले, प्रस्ताविक विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत शिंदे यांनी केले या वेळी विभागातील डॉ. गणेश फलके, प्रा. मधुरा सातपुतेप्रा. मनोज मेहर, प्रा. यशवंत सोनूने, डॉ. अरविंद महाजन, प्रा. सुग्रीव वासरे, प्रा. चौरे, प्रा. सारडा , डॉ. सुशांत देशमुख, डॉ. सौ. डी. के. देशपांडे, प्रा. नाथांनी आदी उपस्थित होते. यासाठी संशोधक विद्यार्थी मिस. प्रा. राखी पारवे , प्रा. वर्मा मॅम, कावेरी वाघ व श्री रतन रानवलकर यांनी सादरीकरण केले आणि मेहनत घेतली.

## महाराष्ट्र पोलिसन दलात १५,६३१ पदांची मेगा भरती जाहीर



**मुंबई :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने १२ ऑगस्टच्या बैठकीत १५,६३१ पदांची पोलिस भरती करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार गृह विभागाने पोलिस शिपाई आणि कारागृह शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबवण्यास मंजुरी दिली असून, यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णयही जारी करण्यात आला आहे.
महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलिस शिपाई तसच कारागृह विभागातील कारागृह शिपाई संवर्गातील दि.१ जानेवारी २०२४ ते दि ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत रिक्त झालेली आणि शासन निर्णय क्रमांकः पोलिस-११२५/प्र.क.१७३/पोल-५अ, दिनांक २० ऑगस्ट, २०२५ दि.०१ जानेवारी २०२५ ते दि ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत रिक्त होणारी १५६३१ पदे भरतीकरीता उपलब्ध होणार आहेत.

**पदनाम : रिक्त पदांची संख्या**
- •पोलिस शिपाई : १२३९९
- •पोलिस शिपाई चालक : २३४
- •बॅण्डस्मन : २५
- •सशस्त्र पोलिस शिपाई : २३९३
- •कारागृह शिपाई : ५८०

**एकूण** १५६३१

शासन निर्णयानुसार सामान्य प्रशासन विभागाच्या ४ मे २०२२ आणि २१ नोव्हेंबर २०२२ च्या शासन निर्णयातील तरतूदींमधून शिथिलता देऊन पोलिस शिपाई भरती सन २०२४-२५ ची भरती प्रक्रिया घटकस्तरावरुन राबवण्यास तसेच ओएमआर आधारीत लेखी परीक्षा घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. सन २०२२ व सन २०२३ मध्ये संबंधित पदाची विहित कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना एक वेळची विशेष बाब म्हणून प्रस्तुत भरती प्रक्रियेकरीता आवेदन अर्ज सादर करण्यास पात्र ठरविण्यात आले आहे.

या भरती प्रकियेसाठीही या पूर्वीच्या पोलिस शिपाई भरतीप्रमाणेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.४५०/- व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरीता रु.३५०/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यास तसेच परीक्षा शुल्क स्वरुपात जमा झालेली रक्कम आवश्यकतेनुसार भरती प्रक्रियेकरीता खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ ऑगस्ट २०२५

# विद्यापीठांमधील शैक्षणिक स्वातंत्र्याची पीछेहाट



उच्च शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येकाला हे माहीत आहे की, शैक्षणिक स्वातंत्र्य खूप महत्त्वाचे असून विद्यापीठ अशी जागा आहेत जिथे प्रत्येक गोष्टीवर शंका घेतली जाते आणि प्रश्न विचारले जातात. उत्तम ज्ञान मिळवण्यासाठी (quest for excellence) नवीन कल्पनांचा शोध घेणे, संबंधित विषयांवर चर्चा करणे आणि स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे.

ज्ञान तेव्हाच वाढते जेव्हा आपण आधीपासून असलेल्या ज्ञानावर प्रश्न विचारतो. याचा अर्थ, विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य असावे आणि शिक्षकांनाही त्यांच्या विषयातील प्रचलित विचारांवर प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य असावे. एक संस्था म्हणून, विद्यापीठांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय बाबतीत प्रश्न विचारण्याचे, आपली मते मांडण्याचे आणि टीका करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे.

खरं तर, ज्ञानाचा विकास हाच विद्यापीठांच्या शिक्षणाचा गाभा आहे. विद्यार्थी शिकण्यासाठी उच्च शिक्षणाच्या जगात येतात. आधीपासून असलेले ज्ञान समजून घेणे हे पहिले पाऊल आहे. त्यानंतर योग्य प्रश्न विचारणे, प्रचलित विचारांवर टीका करण्याची क्षमता असणे आणि छापलेल्या शब्दांच्या अधिकाराला विरोध करण्याची हिंमत असणे ही पुढची पावले आहेत. अर्थात, शिकणे ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे जी कधीच थांबत नाही. त्यामुळे, विद्यार्थ्यांना काय शिकवायचे हे विद्यापीठांनीच ठरवावे, त्यावर बाहेरून कोणीही नियंत्रण ठेवू नये. विद्यार्थ्यांना संबोधित करण्यासाठी कोणाला बोलावायचे, यावर कोणतेही बंधन नसावे. या स्वातंत्र्यावर मर्यादा आणल्यास शिकण्याची प्रक्रिया थांबते, ज्यामुळे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीलाही अडथळा येऊ शकतो. संशोधनाच्या जगातही असेच स्वातंत्र्य आवश्यक आहे.

संशोधनाचे विषय विद्यापीठांनी ठरवावे. संशोधनाचा कार्यक्रम शिक्षकांनी ठरवावा. संशोधनासाठी मिळणारे आर्थिक सहाय्य कोणत्याही पक्षपाताशिवाय किंवा पूर्वग्रहाशिवाय तज्ज्ञांच्या पुनरावलोकनावर (peer review) आधारित असावे. मतभेद असलेले विचार किंवा नेहमीपेक्षा वेगळ्या विचारांना प्रोत्साहन दिले पाहिजे, कारण अशाप्रकारेच ज्ञानाचा विकास होतो. मूलभूत संशोधनाला तर स्वातंत्र्य, संसाधने आणि वेळेची खूप जास्त गरज असते. अशा वातावरणातच हुशार विद्वान आणि विचारवंत पुढे येऊ शकतात आणि त्यांची भरभराट होऊ शकते.

**भारतातील विचलित करणारी वास्तविकता**

भारतातील सद्यस्थिती चिंताजनक आहे. अभ्यासक्रम कठोरपणे नियंत्रित केले जात आहेत. वाचण्यासाठीचे साहित्य (readings) ठरवून दिले जाते. खरं तर, कोणत्या गोष्टी वाचायच्या यादीत ठेवाव्या किंवा वगळाव्या हे शिक्षक नव्हे, तर इतर कोणीतरी ठरवत आहे. काही साहित्य तर स्पष्टपणे वगळले जात आहे. सामाजिक विज्ञान किंवा मानविकीमध्ये, मुख्य प्रवाहापासून वेगळे असलेले आश्वासक संशोधन दडपले जात आहे. संशोधन निधीवर केंद्र सरकार आपल्या संशोधन परिषदा आणि विभागांद्वारे थेट किंवा अप्रत्यक्षपणे नियंत्रण ठेवत आहे.

या अशा परिस्थितीत, भारतातील विद्यापीठांमध्ये मूलभूत संशोधन होणे हे दुर्मिळच नाही, तर जवळपास अशक्य झाले आहे. आपल्या विद्यापीठांमधून एकही नोबेल पारितोषिक विजेता तयार झाला नाही, हा काही योगायोग नाही. विद्यार्थी आणि शिक्षकांना कॅम्पसमध्ये चर्चा किंवा वादविवाद आयोजित करण्याचे स्वातंत्र्यही मर्यादित केले जात आहे. विशेषतः जेव्हा ते वादविवाद भारतीय जनता पक्ष किंवा केंद्र आणि राज्यातील त्यांच्या सरकारांवर टीका करणारे मानले जातात, तेव्हा प्रशासकीय आदेश किंवा दंडात्मक कारवाईद्वारे ते थांबवले जातात. सोशल मीडियावरील पोस्टमुळे कधीकधी विद्यापीठांकडून शिस्तभंगाची कारवाई किंवा सरकारकडून कायदेशीर कारवाई होते, ज्यामुळे स्वातंत्र्यावर आणखी बंधने येतात.

अनेक केंद्रीय विद्यापीठांमध्ये, जर एखादा प्राध्यापक परदेशात होणाऱ्या परिषदेत सहभागी होण्यासाठी ड्युटी रजेसाठी अर्ज करतो, तर त्याला/तिला एक लेखी हमीपत्र द्यावे लागते ज्यामध्ये असे म्हटले आहे: "मी कोणत्याही सरकारविरोधी कारवायांमध्ये सहभागी होणार नाही... मी परदेशात असताना, अधिकृत ड्युटीवर असो किंवा वैयक्तिक भेटीवर असो, मी सरकारी कर्मचाऱ्यांच्या आचारसंहितेच्या सर्व तरतुदींना अधीन राहीन, ज्यात प्रसार माध्यमाशी संबंध आणि सरकारच्या टीकेशी संबंधित तरतुदींचा समावेश आहे... पुढे मी समजतो की... भारतात असो किंवा परदेशात, या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन केल्यास मला शिस्तभंगाच्या कारवाईला समान जबाबदार धरले जाईल."

वेगवेगळ्या स्वरूपातील अशी घुसखोरी आता खाजगी विद्यापीठांमध्येही केली जात आहे. विद्यार्थ्यांचे किंवा प्राध्यापकांचे असहमत किंवा टीकात्मक आवाज शिस्तभंगाच्या कारवाईने शांत केले जातात. काही प्रकरणांमध्ये, ते बरेच पुढे जाते, कारण जोखीम टाळणारे प्रवर्तक त्यांच्या बाजूने असतात, कारण ते केंद्र सरकारला किंवा त्यांच्या विद्यापीठांमध्ये असलेल्या राज्य सरकारांना नाराज करू इच्छित नाहीत किंवा त्यांचा विरोध करू इच्छित नाहीत.

**स्वायत्तता आणि उत्तरदायित्व**

राजकीय लोकशाहीच्या व्यापक संदर्भात विद्यापीठांचे स्वातंत्र्य खूप महत्त्वाचे आहे, कारण उच्च शिक्षण देण्यासोबतच, त्यांची एक महत्त्वाची भूमिका असते. अर्थव्यवस्थेसाठी, ती विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, विकास आणि आर्थिक-सामाजिक धोरणांसाठी कल्पनांचा स्रोत आहेत. समाजात, ते सार्वजनिक विचारवंत म्हणून काम करतात, जे आपल्या लेखांमधून किंवा व्याख्यानांमधून नागरिकांना माहिती देतात. राजकारणात, सरकारांच्या कामाचे त्यांचे मूल्यांकन उत्तरदायित्व वाढवते. अर्थात, या स्वातंत्र्यासोबत उत्तरदायित्वही असले पाहिजे. परंतु, विद्यापीठांना पैसे दिल्याने त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार सरकारांना मिळत नाही, हे त्यांनी समजून घेणे महत्त्वाचे आहे.

ही संसाधने सार्वजनिक विद्यापीठांसाठी जनतेचा पैसा आहेत, जी विद्यार्थी आणि समाजासाठी उत्तरदायी आहेत. यासाठी, विद्यापीठांमधील प्रशासकीय रचना योग्य आणि उत्तरदायित्वाला अनुकूल असावी. सुशासन आवश्यक आहे, पण ते पुरेसे नाही. सार्वजनिक क्षेत्रात नियंत्रण आणि संतुलनाची (checks and balances) यंत्रणाही असावी. या संदर्भात विद्यापीठांची क्रमवारी (rankings) महत्त्वाची भूमिका बजावते. अशा क्रमवारी, त्यांच्या काही मर्यादा असल्या तरी, विद्यार्थी, त्यांचे पालक आणि संपूर्ण समाजासाठी उत्तरदायित्वाची एक संस्थात्मक यंत्रणा प्रदान करतात. हे खूप महत्त्वाचे आहे की, नियामक रचना विद्यापीठांना पूर्ण प्रशासकीय, आर्थिक आणि शैक्षणिक स्वातंत्र्य देतात. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बंधनातून मुक्तता ही एक आवश्यक अट आहे.

आपली विद्यापीठे तयार करणाऱ्या सध्याच्या संसदीय किंवा कायदे मंडळाच्या कायद्यांमध्येही अनेक बंधने आणि मर्यादा आहेत. त्यामुळे, विचार, सर्जनशीलता आणि शिक्षणासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यासाठी नियंत्रणे किंवा हस्तक्षेपांऐवजी नियामक रचनांमध्ये सुधारणा करणे, विद्यापीठांना स्वायत्तता देणे आणि प्रणालींद्वारे उत्तरदायित्व सुनिश्चित करणे हा दृष्टिकोन अधिक चांगला ठरेल. एकसारखेपणाचा (uniformity) आग्रह हा विचार, सर्जनशीलता, समज आणि ज्ञानाचा सर्वात मोठा शत्रू आहे. या गोष्टी फक्त खुल्या/ मुक्त समाजातच वाढू शकतात. 'एकच नियम सर्वांना लागू' ही चुकीची धारणा आहे. खरं तर, उच्च शिक्षणातील उत्कृष्टतेच्या शोधात विविधता आणि भिन्नता हे अविभाज्य भाग आहेत.

**सरकारे आणि त्यांच्या नियंत्रणाचा ध्यास**

विद्यापीठांमधील शैक्षणिक स्वातंत्र्यावर केवळ भारतातच नव्हे, तर अर्जेंटिना, हंगेरी आणि तुर्कस्तानसारख्या लोकशाही पद्धतीने निवडलेली सरकारे असलेल्या देशांमध्येही मर्यादा आहेत. अर्थात, आफ्रिका आणि आशियातील हुकूमशहांच्या राजवटी असलेल्या देशांमध्ये शैक्षणिक स्वातंत्र्य खूप मर्यादित आहे. चीन, रशिया आणि व्हिएतनामसारख्या एक-पक्षीय राजवट असलेल्या देशांमध्येही ते दडपले जाते. चीन थोडा वेगळा आहे. जरी शिक्षकांना - विशेषतः सामाजिक विज्ञान आणि मानविकीमध्ये - सार्वजनिक क्षेत्रात बोलण्याचे किंवा लिहिण्याचे स्वातंत्र्य अत्यंत मर्यादित असले, तरी अग्रगण्य विद्यापीठांमधील शैक्षणिक नेमणुकांच्या गुणवत्तेमध्ये कोणत्याही पक्षपातामुळे तडजोड केली जात नाही.

खरे आश्चर्य युनायटेड स्टेट्समध्ये घडत आहे, जिथे विद्यापीठांमधील शैक्षणिक स्वातंत्र्य एक शतकाहून अधिक काळ पवित्र मानले गेले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार संशोधन अनुदानांमध्ये कपात करत आहे आणि त्यांच्या अग्रगण्य सार्वजनिक विद्यापीठांवर बंधने लादत आहे. जर हे असेच सुरू राहिले, तर शिक्षण, संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नावीन्य यांमध्ये अमेरिकन विद्यापीठांचे अग्रस्थान नक्कीच कमी होईल.

सरकारे विद्यापीठांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करतात, कारण त्यांना त्यांच्यावर होणाऱ्या टीकेची किंवा मतभेदांची भीती असते. त्याचबरोबर, शैक्षणिक स्वातंत्र्यामुळे सक्षम झालेली विद्यापीठे असे प्रश्न विचारतात, जे त्यांना (सरकारला) कठीण वाटतात, त्यामुळे त्यांना (सरकारला) एक प्रकारचा अस्वस्थपणा किंवा असुरक्षितता जाणवते. अर्थात, काही देशांमध्ये, राज्य सरकारांना केवळ वैचारिक एकरूपता (ideological conformity) हवी असते. बहुतेक विद्यापीठे आपले स्वातंत्र्य गमावतात कारण ती शिक्षण आणि संशोधनासाठी सरकारी अनुदानावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात. काही शिक्षक वैयक्तिकरित्या अबोल राहतात कारण त्यांना भीती वाटते किंवा ते तडजोड करतात, तर आपणाला काही लाभ मिळावे यासाठी काहीजन आपली तत्त्वे विकण्यास तयार असतात. थोडक्यात, वर उल्लेख केलेल्या सर्व बाबींचा थोडक्यात अर्थ असा की, विद्यापीठांमध्ये शैक्षणिक स्वातंत्र्याच्या अभावामुळे अध्यापन-शिक्षण प्रक्रियेला अपरिहार्यपणे हानी पोहोचू शकेल, त्याचप्रमाणे संशोधनातील विचार आणि सर्जनशीलतेलाही खीळ बसेल. विद्यार्थी आणि शिक्षकांचे नुकसान होईलच. तथापि, अर्थव्यवस्था, समाज आणि राजकारण यांचे कधीही भरून न येणारे नुकसान होईल

**दीपक नय्यर /**
**अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे**

दीपक नय्यर, अर्थशास्त्रज्ञ, दिल्ली विद्यापीठाचे माजी कुलगुरू

- मराठी अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना,
- पूर्व प्रसिद्धी : द हिंदू / गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५, मुंबई,

https://www.thehindu.com/opinion/lead/the-ceding-of-academic-freedom-in

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २१ ऑगस्ट २०२५


# ज्येष्ठ नागरिक : अनुभवसंपन्न आयुष्याचा अमूल्य ठेवा

मानवी जीवनाच्या प्रवासात बाल्य, तारुण्य आणि प्रौढत्व पार केल्यानंतर येणारा टप्पा म्हणजे ज्येष्ठत्व होय. हा टप्पा केवळ शारीरिक क्षीणतेचा नसून जीवनातील साठवलेल्या अनुभवांचा, मूल्यांचा आणि संस्कारांचा खजिना असतो. या प्रवासात माणसाने जे काही पाहिले, अनुभवलं, शिकलं आणि पुढच्या पिढ्यांना दिलं, तेच त्याचं खरं वैभव असतं. म्हणूनच 'ज्येष्ठ नागरिक' हा शब्द फक्त वयाची ओळख देणारा नाही तर समाजाचा पाया घडविणाऱ्या आणि दिशादर्शक ठरणाऱ्या पिढीचा गौरव करणारा आहे. २१ ऑगस्ट हा दिवस दरवर्षी 'ज्येष्ठ नागरिक दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ ज्येष्ठ व्यक्तींचे कौतुक करण्यापुरते मर्यादित नाही, तर समाज म्हणून आपली जबाबदारी ओळखण्याची आणि कृतज्ञतेची जाणीव ठेवण्याची संधी देणारा आहे.

आजच्या गतिमान आणि धावपळीच्या युगात आपण अनेकदा वर्तमान आणि भविष्याच्या मागे इतके धावत असतो की आपल्या भूतकाळाचे जतन करणाऱ्या आणि आपल्याला आजचे बळ देणाऱ्या स्तंभांकडे लक्ष द्यायला आपण विसरतो आहोत. हे स्तंभ म्हणजे आपल्या समाजातील ज्येष्ठ नागरिक आहेत. २१ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा 'ज्येष्ठ नागरिक दिन' म्हणजे या अनुभवसंपन्न पिढीला मानाचा मुजरा करण्याची एक संधी आहे. हा दिवस केवळ औपचारिकरीत्या स्मरण करण्यासाठी नसून, त्यातून आपण समाज म्हणून आपल्या जबाबदाऱ्या किती प्रामाणिकपणे पार पाडत आहोत, याचा गंभीर विचार करण्याचा दिवस आहे. ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे जिवंत ग्रंथालय आहेत. त्यांच्या आठवणी, अनुभव, शिकवणी आणि संस्कार यांतून पुढच्या पिढ्यांना दिशा मिळते. आज आपण ज्या आधुनिकतेचा, प्रगतीचा आणि बदलत्या जगाचा अनुभव घेतो, त्यामागे या ज्येष्ठांची आयुष्यभराची कष्टमय वाटचाल, त्याग, संघर्ष आणि स्वप्ने दडलेली आहेत. त्यांच्या श्रमाचे, घामाचे थेंब आजच्या उंच इमारतींच्या पायाभरणीत मिसळलेले आहेत, त्यांच्या संस्कारांनीच आजच्या पिढ्या उभ्या राहिल्या आहेत. पण प्रश्न असा आहे की आपण त्यांच्या कष्टांचा, त्यागाचा, अनुभवाचा आणि अस्तित्वाचा सन्मान खऱ्या अर्थाने करतो आहोत का ते बघणे महत्वाचे आहे.

भारतासारख्या कुटुंबप्रधान संस्कृती असलेल्या देशात ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान, त्यांची सेवा आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे ही केवळ परंपरा नव्हे तर संस्कृती होती. 'आई-वडिल' हे सर्वश्रेष्ठ आहेत ही शिकवण देणाऱ्या या भारत भूमीत आज मात्र अनेक ज्येष्ठ व्यक्ती एकटेपणाने जीवन जगत आहेत. आपल्या परंपरेत ज्येष्ठांचा आशीर्वाद ही सर्वात मोठी संपत्ती मानली जाते. घरातील आजी-आजोबा केवळ घर सांभाळणारे नसतात, तर ते महत्वपूर्ण संस्कारांची जिवंत शाळा असतात. मुलांच्या अंगी दयाभाव, संयम, कर्तव्यनिष्ठा आणि परिश्रमशीलता यांची बीजे तेच पेरत असतात. त्यामुळे ज्येष्ठांना दुर्लक्षित करणे म्हणजे आपल्या संस्कृतीला नाकारण्यासारखे आहे. पण आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या जीवनशैलीत हीच पिढी अनेकदा एकाकीपणाला, उपेक्षेला व असुरक्षिततेला सामोरे जात आहे. परिणामी वृद्धांचा सामाजिक सहभाग कमी झाला. अनेक ज्येष्ठांना निवृत्तीनंतर केवळ चार भिंतीत वेळ घालवावा लागतो. त्यांचं अस्तित्व केवळ औपचारिक आदरापुरतं मर्यादित होत चाललं आहे. ही वस्तुस्थिती निश्चितच चिंताजनक आहे.

विभक्त कुटुंबपद्धती, शहरीकरण, रोजगाराच्या निमित्ताने होणारे स्थलांतर, जीवनशैलीतील बदल या सगळ्यामुळे ज्येष्ठ व्यक्तींचा समाजातील दर्जा हळूहळू कमी होत चाललेला दिसतो आहे. अनेकांची मुलं नोकरीसाठी परदेशी गेलेली आहेत, तर काहींना रोजंदारीच्या धावपळीमुळे आईवडिलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक आज वृद्धाश्रमात आपले उरलेले आयुष्य कंठण्यास भाग पाडले गेले आहेत. ज्येष्ठत्व ही केवळ शारीरिक बाब नाही, ती मानसिक आणि सामाजिक पातळीवरही गंभीर परिणाम करणारी अवस्था आहे. वयोमानानुसार आरोग्याच्या तक्रारी, शारीरिक अशक्तपणा, औषधोपचारांची गरज वाढत जाते. पण त्याहीपेक्षा गंभीर बाब म्हणजे मानसिक एकटेपणा होय. आपल्या सर्वांना माहितीच आहे की माणूस एकटेपणाने मोडतो. आपलेपणा, आधार, सहवास आणि माया ही त्याला सर्वाधिक गरजेची असते. पण दुर्दैवाने हेच आज ज्येष्ठांच्या जीवनातून झपाट्याने नाहीसे होत चालले आहे. ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न केवळ भावनिक पातळीवर मर्यादित नाहीत. त्यांना आरोग्यविषयक सुविधा, आर्थिक सुरक्षितता, सामाजिक दर्जा, मानसिक समाधान आणि समाजात मान-सन्मान देणे महत्त्वाचे आहे. वय वाढल्यावर शरीरातील अवयवांची ताकद कमी होते, स्मृती मंदावते, हालचाल कमी होते. या टप्प्यात त्यांना उत्तम आरोग्यसेवा मिळणं अत्यावश्यक ठरतं. पण आपल्या देशात ग्रामीण भागात अजूनही ज्येष्ठांच्या आरोग्यविषयक सुविधा अपुऱ्या आहेत. आर्थिक दृष्ट्या सुद्धा अनेक ज्येष्ठ नागरिक असुरक्षित असतात. त्यामुळे त्यांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण होतो. अशा परिस्थितीत वृद्धांचे जीवन त्यांच्या मुलांवर अवलंबून राहते. पण जर कुटुंबानेच दुर्लक्ष केले, तर त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने संघर्षमय बनते. मानसिक पातळीवर ज्येष्ठत्व हे अधिक मोठे आव्हान असते. तारुण्यात समाजात कार्यरत असलेला, घरातील निर्णय घेणारा आणि समाजात मानाचा असलेला व्यक्ती अचानक एका कोपऱ्यात बसवला जातो. परिणामी त्यांच्यामध्ये एकाकीपणा, नैराश्य आणि असुरक्षितता ही मानसिक स्थिती निर्माण होते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतात ज्येष्ठांची संख्या झपाट्याने वाढत आहे. येत्या काही दशकांत ही संख्या इतकी मोठी होईल की समाजाच्या संरचनेवर त्याचा परिणाम होणारच आहे. म्हणूनच ज्येष्ठांची काळजी घेणे, त्यांच्या गरजांचा विचार करणे, त्यांच्यासाठी योग्य धोरणे आणि सुविधा निर्माण करणे ही तातडीची गरज आहे. सरकार पातळीवर ज्येष्ठांसाठी विविध योजना सुरू आहेत, पेन्शन योजना, आरोग्य विमा, वृद्धाश्रम, सवलतीच्या सुविधा अशा अनेक उपाययोजना अस्तित्वात आहेत. परंतु या योजना खऱ्या अर्थाने गरजूंना कितपत पोहोचतात, याचा वस्तुनिष्ठ आढावा घेणे महत्त्वाचे आहे. केवळ सरकारी पातळीवरच नव्हे, तर सामाजिक आणि वैयक्तिक पातळीवरदेखील आपण प्रत्येकाने ज्येष्ठांबाबतची जबाबदारी पार पाडणे गरजेचे आहे. ज्येष्ठांना केवळ दयेच्या दृष्टीने न पाहता त्यांना सन्मानाने आयुष्य जगता येईल, असे वातावरण निर्माण करणे ही खरी सामाजिक जबाबदारी आहे. घरातील लहान मुले जसे ज्येष्ठांच्या सहवासातून संस्कार शिकतात, जीवनाची दिशा ठरवतात, तसेच ज्येष्ठांनाही तरुण पिढीच्या सहवासातून नवचैतन्य मिळत असते. म्हणूनच दोन पिढ्यांमध्ये अंतर न ठेवता प्रत्येकाने संवादाचे पूल बांधणे आवश्यक आहे. आजच्या तंत्रज्ञानाधारित जगात ज्येष्ठ व्यक्ती अनेकदा मागे पडल्यासारखे वाटतात. मोबाईल, इंटरनेट, डिजिटल व्यवहार यांच्या जगात ते स्वतःला परके समजू लागले आहेत. यामुळे त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होतो आहे. त्यांना या बदलत्या जगाशी जुळवून घेण्यासाठी मदत करणे, त्यांना आत्मविश्वास देणे ही जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. 'जुनं ते सोनं' हे फक्त म्हणीत न ठेवता त्यांच्या अनुभवांचा, ज्ञानाचा उपयोग समाजाच्या वाटचालीत करणे गरजेचे झाले आहे.

ज्येष्ठ नागरिक दिन आपल्याला याच गोष्टींची आठवण करून देतो की ज्येष्ठांचा सन्मान हा केवळ शिष्टाचार नसून आपल्या संस्कृतीचा पाया आहे. त्यांचा अनुभव, त्यांचे मार्गदर्शन, त्यांची शिकवण ही समाजासाठी दीपस्तंभासारखी आहे. आज आपण ज्येष्ठांना जर दुर्लक्षित केले तर पुढच्या पिढ्याही आपल्याला विसरतील, हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे. कारण आज आपण जे करतो तेच उद्या आपल्याही वाट्याला येऊ शकते यात शंका नाही. या ज्येष्ठ नागरिक दिनी आपण समाज म्हणून एक संकल्प करायला हवा की कोणतीही ज्येष्ठ व्यक्ती एकाकीपणाने जगणार नाही. प्रत्येक कुटुंबात ज्येष्ठांना आपलेसे केले जाईल, त्यांना सन्मान दिला जाईल. सरकार आणि समाज या दोघांनीही ज्येष्ठांच्या कल्याणासाठी ठोस उपाययोजना केल्या पाहिजेत. वृद्धाश्रम हे पर्याय असू शकतात; पण ती शेवटची पायरी ठरावी. त्याऐवजी 'डे-केअर सेंटर्स', 'हेल्थ क्लब्स', 'ज्येष्ठ नागरिक संघ' यांसारख्या उपक्रमातून त्यांना सामाजिकदृष्ट्या सक्रिय ठेवता येईल. प्रत्येक समाजाने ज्येष्ठांसाठी आधार केंद्रे, संवाद मंच उभारले पाहिजेत. तरुणांनी ज्येष्ठांच्या सहवासातून शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे. ही एकमेकांना पूरक अशी परंपरा पुन्हा रुजवणे, ही खरी काळाची गरज आहे.

एकविसाव्या शतकाच्या या वेगवान युगात आपण जर ज्येष्ठांना सामावून घेतले नाही, तर समाजाच्या संस्कृतीला पोकळी निर्माण होईल. कारण आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ हे केवळ व्यक्ती नसतात, तर ते आपल्या परंपरेचे रक्षक, संस्कृतीचे वाहक आणि मूल्यांचे जतन करणारे सदस्य असतात. म्हणूनच या ज्येष्ठ नागरिक दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील, समाजातील, परिसरातील ज्येष्ठांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा. त्यांच्या अनुभवाचा आदर, त्यांच्या आयुष्याचा सन्मान, त्यांच्या सेवाभावाचा गौरव आणि त्यांच्या अस्तित्वाचा स्वीकार हा आपल्यासाठी एक नैतिक कर्तव्य आहे. समाजाचा खरा विकास हा तेव्हाच मोजला जाईल जेव्हा समाजातील सर्वात वयोवृद्ध नागरिक सन्मानाने, आनंदाने आणि आत्मविश्वासाने आपले आयुष्य जगतील. समाजात 'ज्येष्ठ नागरिक दिन' हा केवळ औपचारिक उत्सव न राहता, तो ज्येष्ठांबद्दलच्या आपुलकीचा, कृतज्ञतेचा आणि जबाबदारीचा दिवस व्हावा. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था यांनी या दिवशी कार्यक्रम घेऊन तरुण पिढीला ज्येष्ठांचा आदर करणे शिकवायला हवे. आपल्या संस्कृतीत 'ज्येष्ठांचा आशीर्वाद म्हणजे भाग्य' ही धारणा होती. ही जपणे हेच खरे संस्कार असतील.

शेवटी एवढंच म्हणावंसं वाटतं की ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे अनमोल रत्न आहेत. त्यांचा अनुभव म्हणजे ज्ञानाचा अथांग सागर आहे. त्यांना बाजूला काढणे म्हणजे समाजाच्या दिशादर्शक दीपस्तंभालाच विझवणे होय. म्हणूनच प्रत्येकाने ठरवू या की आपल्या घरातील, शेजारच्या आणि समाजातील ज्येष्ठांना आपण केवळ सन्मानच देणार नाही तर त्यांच्या आयुष्याची संध्याकाळ आनंदमय करू. तेव्हाच ज्येष्ठ नागरिक दिन खऱ्या अर्थाने सार्थ ठरेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे, नाशिक**

(लेखक, सहाय्यक प्राध्यापक असून समाजशास्त्र आणि वृध्दत्वशास्त्राचे अभ्यासक आहेत)

मो. क्र. ९९६०१०३५८२, ईमेल — bagate.rajendra4@gmail.com